*****

# राज्यशास्त्र विभाग

## प्रकल्प अहवाल

सुकळी गावातील रहिवाशांच्या राजकीय जाणिव जागृतीचा अभ्यास

लोक महाविद्यालयाच्या, राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना २००३ मध्ये करण्यात आली. या अभ्यास मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात.

सत्र २०१३-१४ मध्ये अभ्यासेत्तर कार्यक्रमाअतंर्गत ४१ विद्यार्थ्यांनी नजीकच्या सुकळी गावाला भेट देवून प्रश्नावलीच्या माध्यमातून तेथील रहिवाश्यांच्या राजकीय जाणिव संदर्भात अभ्यास केला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सर्व माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण करूण निष्कर्ष काढला. यामध्ये असे लक्षात आले की. तेथील लोकांचे राजकीय ज्ञान अत्यल्प आहे. फक्त ५ टक्के लोकांना निवडणुकीत निवडून आलेल्या विविध स्तरावरील प्रतीनिधींचे नावे माहीत होते. स्थानिक स्वशासनाची (पंचायत राज) माहीती होती. इतर लोकांना या बाबतचे ज्ञान नव्हते. ४ टक्के लोकांना तर सरपंचाचे सुद्धा नाव माहीत नव्हते. एकूणच त्यांचे राजकीय ज्ञान सर्व बाबतीत अत्यल्प होते. या वरून सुकळीच्या रहिवाशांना या सर्व बाबतीची स्थानीक, स्वशासनाची माहीती देणे आवश्यक आहे हे लक्षात आले. त्यामुळे हा प्रकल्प पुन्हा २ सत्रात राबवयाचा असे विद्यार्थ्यांनी ठरविले. त्यानुसार प्रा. पाटणे यांनी २२ विद्यार्थ्यांची निवड केली. सर्व प्रथम या विद्यार्थ्यांना प्रश्नावलीतील उत्तराबाबत माहिती देण्यात आली.

Scanned with CamScanner

चार्ट्स तयार करण्यात आले. गावकऱ्याशी संवाद कसा साधावा हे सांगण्यात आले. त्यानंतर १३-१४ जानेवारी ला सर्व साहित्यासह प्रा. पाटणे व अन्वर खान यांच्यासह सर्व विद्यार्थी सुकळी येथे गेले. एकूण ६ गटात या विद्यार्थ्यांची विभागणी करण्यात आली. प्रत्येक गट १०-१५ घरी गेलेत व कुटूंबातील विद्यार्थ्यांशी सवांद साधून त्यांना राजकीय प्रतिनिधीचे नावे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थविषयी माहीती दिली.

या वेळी अनेक लोकांनी ही माहिती घेत असतांना आपल्या वैयक्तिक, कौटुबातील समस्या सुध्दा सांगितल्या एकूणच विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा अनुभव वेगळा होता. या उपक्रमाबाबद गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. यासाठी महाविद्यालयाचे, माजी विद्यार्थी व सुकळीचे उपसरपंच श्री ओम प्रकाश ढवळे यांनी सहकार्य केले.

पुढील सत्रात सुद्धा दोनदा त्या गावात जाऊन गावकऱ्यांशी संवाद साधून जास्तीत जास्त माहिती यावर विचार करण्यात आला. या प्रकल्पासाठी

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ पुष्पा तायडे मॅडम तसेच सर्व प्राध्यापकांचे, विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

लोक महाविद्यालयाच्या स्थापनेपासून १९८७ राज्यशास्त्र विषयाच्या अध्यापनाला सुरूवात झाली. विद्यार्थ्यांच्या राज्यकीय जाणिव वृध्दींगत होण्यासाठी राज्यशास्त्र विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांच्या जिवनात उपयोगी ठरते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापिठाच्या उन्हाळी २०१३ परीक्षांमध्ये राज्यशास्त्र विभागाचे निकाल पुढील प्रमाणे आहेत

बी. ए. भाग १- ६४.४५% बी. ए. भाग २- ९४.७२% बी. ए. भाग ३- १००%

यामध्ये प्रथम वर्षाचे ०२, व्दितीय वर्षाचे ०३, तर तृतीय वर्षाचा ०१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेत.

सत्र २०१३-१४ मध्ये राज्यशास्त्र विभागात एकूण ६५९ विद्यार्थी असून वर्गनिहाय संख्या पुढील प्रमाणे आहे. बी. ए. १-१९३, बी. ए २-११३, बी.ए. ३ -५७, एम. ए. १-०३ व एम. ए. २-०२

सत्र २०१३-१४ मध्ये ऑगष्ट महिन्यात राज्यशास्त्र मडंळाची स्थापना करण्यात आली. बी. ए. भाग ३ ची विद्यार्थीनी कु. किशोरी भिसे हिची अध्यक्ष म्हणून तर कु. गौहकर हिंची सचिव म्हणून निवड करण्यात आली.

या मंडळाअंतर्गत १३ जानेवारी २०१४ ला सुकळी गावात निवडक विद्यार्थ्यांना नेण्यात आले. मागील सत्रातील अभ्यासावरून असे लक्षात आले होते की, या गावतील लोकांचे राजकीय ज्ञान अत्यल्प आहे. राजकीय जाणिव जागृतीचा अभाव आहे. त्यामुळे या भेटीत त्यांना स्थानिक स्वराज्य

Scanned with CamScanner

संस्थाची रचना, कार्य इ. बाबत माहीती देण्यात आली. एकूण २२ विद्यार्थी या प्रकल्पात सहभागी झालेत.

दि. १९ ऑक्टोबर १३ या सत्रात बी. ए. १ च्या विद्यार्थ्यांचे उद्देश पत्रिका स्वरूप उदिष्टे, उगमस्थान आणि भारतातील नागरीकांचे मुलभूत अधिकार तर दि. २१ ऑक्टोबर १३ ला राष्ट्रपतीचे कार्ये व अधिकार आणि भारतातील संविधानाची ठळक वैशिष्ट्ये या विषयावर वर्गामध्ये चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

बी.ए. ३ च्या वर्गामध्ये दि. १५ जाने २०१४ ला दबावगट या विषयावर या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले.

दि. २२ जाने. २०१४ ला रा. तु. म. विद्यापिठाच्या राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. एस. बी. येवलेकर, बिडकर महाविद्यालय, हिगणघाट यांचे भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

वरील सर्व कार्यक्रम घेण्यासाठी लोक, शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व माननीय पदधिकारी, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

प्रा. सुनिल पाटणे

राज्यशास्त्र विभाग

Scanned with CamScanner

# राज्यशास्त्र विभाग (2014-15)

लोक महाविद्यालयाच्या स्थापनेपासून म्हणजेच १९८७ पासून राज्यशास्त्र विषयाच्या अध्यापनाला सुरुवात झाली. विदयार्थ्यांचा राजकीय सहभाग वाढण्यासाठी तसेच त्यांच्या राजकीय जाणिवां वृध्दींगत होण्यासाठी राज्यशास्त्र या विषयाचे ज्ञान विदयार्थ्यांना उपयोगी ठरते. सत्र २०१४–१५ मध्ये राज्यशास्त्र विभागात एकूण ४०६ विदयार्थ्यांनी प्रवेश घेतला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या उन्हाळी २०१४ परीक्षेचे निकाल समाधान कारक असून वर्गनिहाय निकाल खालील प्रमाणे आहेत.

बी.ए.भाग १ – ६०.२८ , बी.ए.भाग २ – ८३.५०, बी.ए.भाग ३ – ९३ २७ नोव्हेंबरला राज्यशास्त्र विभागातर्फे सर्व विद्यार्थ्यांना 'भारतातील आणिबाणी' या विषयावर एक डाक्युमेन्ट्री फिल्म दाखविण्यात आली. भारतामध्ये आणिबाणी कोणत्या परीस्थितीत लावण्यात आली तत्कालीन राजकीय नेत्यांनी भुमिका इ. सर्वांचा उलगडा त्यामुळे विद्यार्थ्यांना झाला यावेळी २०० विदयार्थ्यांची उपस्थिती होती. ०३ फेब्रुवारीला राज्यशास्त्र विभागातील विदयार्थ्यांना 'पीपली लाईव्ह' हा चित्रपट दाखविण्यात आला. आजची प्रसार माध्यमे कशा अतिरंजीत बातम्या दाखवतात ग्रामीण जीवन कसे दुख:दायक आहे, शेतक–यांची हलाखीची परीस्थिती कशी आहे. यावर या चित्रपटात प्रकाश टाकण्यात आलेला होता. सुमारे २१० विदयार्थ्यांची उपस्थिती यावेळी होती. जेव्हा गरज भासेल तेव्हा विदयार्थ्यांना स्मार्ट फोन च्या माध्यमातून वर्गात इंटरनेटवरून विदयार्थ्यांना चित्रफित किंवा इतर माहिती दाखविली जाते. प्रा. पाटणे यांनी या सभेत दि. ३१ जानेवारीला न्यु आर्टस कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात भाग घेतला.

प्रा. सुनील दा. पाटणे

Scanned with CamScanner

# राज्यशास्त्र विभाग अहवाल
(२०१५-१६)

लोक महाविद्यालय स्थापनेपासूनच म्हणजेच 1987 पासुन राज्यशास्त्र विभागाची निर्मिती झालेली आहे. विद्यार्थ्यांना सांसदीय लोकशाही तसेच एकूणच त्यांचा राजकीय सहभाग व जाणिवा वृध्दींगत होण्यासाठी हा विषय महत्वाचा आहे.

रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या अभ्यासक्रमानुसार सत्र 2015–2016 मध्ये बी.ए.भाग 1 ला "भारतीय शासन व राजकारण " , बी.ए. भाग 2 ला "राजकीय सिध्दांत व विचारवंत", बी.ए. भाग 3 ला "तुलनात्मक शासन आणि राजकारण " ह्या विषयाचे अध्यापन करण्यात आले. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी दोन चर्चासत्र आयोजित करण्यात आले. दि. 05 |10 |2015 ला सभागृहामध्ये "भारतातील आणि बाणी" या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. 1975 ते 1977 मध्ये भारतामध्ये आणिबाणी जाहीर करण्यात आली होती. त्यावर प्रकाश टाकणारी चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.

दि.08 |10 |2015 ला "भारताचा राष्ट्रपती–स्थान व भूमिका " या विषयावर दुसरे चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी चित्रफीतेच्या माध्यमातून भारतातील घटनातज्ञ तसेच इतर क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी भारतीय राष्ट्रपतीच्या भूमिकेविषयी व्यक्त केलेली मते, भूमिका विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. वरील दोन्ही कार्यक्रमाला राज्यशास्त्र विषयाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

हिवाळी सुटी मध्ये बी.ए.1 व बी.ए.2 चे अतिरीक्त वर्ग घेण्यात आले. दि. 22 |12 |2015 ला साकोली येथे झालेल्या राज्यशास्त्र परिषदेमध्ये प्रा. सुनिल पाटणे यांनी सहभाग नोंदवून "निवडणूक प्रचार मोहीमेमध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका" या विषयावर शोधनिबंध सादर केला.

वरिल सर्व उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे, लो.शि.प्र.मंडळ चे मा. अध्यक्ष व सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

प्रा. सुनिल पाटणे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
लोक महाविद्यालय, वर्धा.

Scanned with CamScanner

# राज्यशास्त्र विभाग अहवाल

लोक महाविद्यालय, वर्धा येथे राज्यशास्त्र या विषयाची सुरुवात महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच म्हणजे १९८७ मध्ये झाली आहे. या विषयाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभाग व राजकीय जाणिवजागृतीची त्यांची समज निश्चितच वृध्दींगत होत असते. तसेच विविध स्पर्धा परीक्षेसाठी बहुतांश विद्यार्थी या विषयाला प्राधान्य देतात.

वर्ष २०१६–२०१७ मध्ये एकूण ३६९ विद्यार्थ्यांनी या विषयासाठी प्रवेश घेतला. त्यामध्ये बी.ए. १ ला १५९, बी.ए. २ ला १३८ व बी.ए. ३ ला ७२ विद्यार्थी होते. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुध्दा विविध कार्यक्रम घेतले गेले.

दि. २१.०९.२०१६ ला ''आंतरराष्ट्रीय संबधातील बदलते प्रवाह'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.



Scanned with CamScanner

प्रमुख वक्ते म्हणून यशवंत महाविद्यालय वर्धा येथील प्रा. रविन्द्र बेले यांनी विद्यार्थ्यांपुढे विषयाच्या संदर्भात, आपले विचार व्यक्त केले.

संविधान दिनाचे औचित्य साधून दि. २.१२.२०१६ ला राज्यशास्त्र विभाग आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी संयुक्तपणे कायदे विषयक शिबिर आयोजित केले. यावेळी श्री. ध.य.काळे, सहदिवाणी न्यायाधिश,वर्धा यांच्या प्रमुख उपस्थितीत इतर सहाय्यक सहदिवाणी न्यायाधिशांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना संबोधित केले. राज्यशास्त्रामध्ये विद्यार्थ्यांना कायदेमंडळाचे अध्ययन करायचे असते. या कायदेमंडळाचे कामकाज प्रत्यक्ष कसे चालते हे दाखविण्यासाठी त्यांना विधिमंडळात घेवून जावे या उद्देशाने महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, नागपूर यांचेशी संपर्क साधण्यात आला त्यांच्या पत्रानुसार आम्हाला दि. ०८.१२.२०१६ ला सकाळी ११ वाजता विधानभवन, नागपूर पाहण्याची परवानगी मिळाली. त्यानुसार १९ विद्यार्थी व ०५ प्राध्यापकांनी विधानभवनाला भेट दिली. विधानसभेमध्ये मा. विनोद तावडे, मा. पंकजा मुंडे, मा. चंद्रकांत बावनकुळे इ. मंत्र्यांना तसेच मा. पृथ्वीराज चव्हान, माजी मुख्यमंत्री इ. मान्यवर नेत्यांना प्रत्यक्ष कामकाजात भाग घेतांना विद्यार्थ्यांना पाहता आले. तसेच विधानपरिषदेमध्ये सुध्दा मा. माणिकराव ठाकरे व इतर मान्यवर पुढा–यांना बघण्याची व त्यांचे वक्तृत्व ऐकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

दि. २३ सप्टेंबर २०१६ विभाग प्रमुख प्रा. सुनिल पाटणे यांनी न्यु आटर्स कॉलेज, वर्धा येथे '' सत्र पध्दती'' या विषयावरील चर्चासत्रामध्ये अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन केले. तसेच दि. १० जानेवारी २०१७ ला यशवंत महाविद्यालय, सेलू येथे ''राजकीय सिध्दांताची प्रासंगिकता'' या विषयावरील व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना संबोधित केले.

वर्ष २०१६–१७ मध्ये विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी व राज्यशास्त्र विभाग यांच्या सयुंक्त विद्यमाने युवकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी भारतीय संस्कृती परीक्षा २०१६ घेण्यात आली.

वर्ष २०१६–१७ पासून रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार सत्र (Semester) पध्दत लागू झालेली आहे. या नुसार बी.ए. १ च्या विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापन करुन २० गुण दयायचे होते. त्याकरीता त्यांचे विविध विषयावर चर्चासत्र घेण्यात आले.

उन्हाळी २०१६ परीक्षेचा बी.ए. १, २ आणि ३ या वर्गाचा निकाल ६०% च्या वर असून समाधानकारक आहे. वरील सर्व उपक्रम राबवितांना प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे यांचे मार्गदर्शन तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांचे सहकार्य लाभले. लोक शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व पदाधिका–यांनी सुध्दा वेळोवेळी सहकार्य केले. या बद्दल सर्वांचे धन्यवाद !

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

**प्रा. सुनिल पाटणे**

************************************************************************************

Scanned with CamScanner

# राज्यशास्त्र विभाग अहवाल २०१७-१८

लोक महाविद्यालय, वर्धा येथे राज्यशास्त्र या विषयाची सुरवात महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच म्हणजे १९८७ मध्ये झाली. या विषयाच्या अध्ययनातून विद्यार्थ्याचा राजकीय सहभाग राहतो. तसेच राजकीय जाणिव आणि जागृतीच्या कक्षा वृंदावतात. विविध स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे बहुतांश विद्यार्थी या विषयाला प्राधान्य देतात.वर्ष २०१७-१८ मध्ये एकूण ४०१ विद्यार्थी राज्यशास्त्र विषयाचे अध्ययन करीत आहे दिनांक १४/०९/२०१७ ला " भारतीय लोकशाहीतील बदलते प्रवाह" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यशवंत महाविद्यालय सेलू येथील प्रा. डॉ. संदीप काळे प्रमुख वक्ते होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ.अविनाश साहुरकर यांनी समयोचीत मागदर्शन केले.

वर्ष २०१७-१८ मध्ये विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी भारतीय संस्कृती परीक्षा २०१७ घेण्यात आली. व र्ष २०१६-१७ पासून रा.तु.म. नागपूर विद्यापिठाच्या निर्देशानुसार सत्र पध्दत (ैमउमेजमत) लागू झालेली आहे. यानुसार बी.ए १ व बी ए २ च्या विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापन करून २० गुण द्यायचे होते. त्यांसाठी त्यांचे विविध विषयावर चर्चासत्र घेण्यात आले.

उन्हाळी २०१७ परीक्षेचे निकाल समाधानकारक आहे. वरील सर्व उपक्रम राबवितांना प्राचार्य डॉ. सौ. पुष्पा तायडे यांचे मार्गदर्शन तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. लोक शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सुध्दा वेळोवळी मागदर्शन व सहकार्य केले. याबद्दल सर्वांचे मनापासून आभार.

**प्रा. सुनिल पाटणे**
लोक महाविद्यालय, वर्धा

Scanned with CamScanner